**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.9 No.5** **May – June 2022**

# आर्थिक विकासातील सहकाराची भूमिका

**प्रा. डॉ. अमृता गणपती मगदुम**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, ता.कागल जि.कोल्हापूर राज्य महाराष्ट्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
***Corresponding Author-* प्रा. डॉ. अमृता गणपती मगदुम**
*ई मेल.agmagdum111@gmail.com*

**घोषवारा :**
लोकशाही मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करून आर्थिक विकास साधण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या विकसनशील राष्ट्रात सहकारी तत्त्वांचा स्वीकार व सहकारी क्षेत्राचा विकास होत असल्याची प्रसाद चिन्हे आज दिसत आहेत .अनियंत्रित भांडवलशाही व अति नियंत्रित समाजवाद यातील दोष टाळून लोकशाही समाजवाद हे राजकीय ध्येय डोळयासमोर ठेवून आर्थिक व सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी भारतात स्वातंत्र्योत्तर काळात अधिक नेटाने व निश्चित स्वरूपात प्रयत्न झालेले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेच्या प्रक्रियेत जर सहकारी क्षेत्राला महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडावयची असेल तर सहकारी तत्त्वांचा अभ्यास व त्याची अंमलबजावणी शास्त्रीय दृष्टिकोनातून होणे ही काळाची गरज आहे.

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतामध्ये लोकशाही नियोजनाचे प्रभावी माध्यम व समाजवादी समाजरचनेच्या उद्दिष्ट पुरतीचे महत्त्वपूर्ण प्रभावी साधन म्हणून सहकारी चळवळीला आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. सहकारी चळवळीच्या यश - अपयशावर भारतातील आर्थिक ,सामाजिक आणि राजकीय प्रेरणांची पूर्ती अवलंबून आहे. त्यामुळे सहकारी चळवळीची निकोप वाढ होण्यासाठी भूतकाळातील तिच्या यशापयशाचे मूल्यमापन करून भविष्यकालीन ध्येय धोरणे ठरवावी लागतील . यासाठी भारतात आढळून येणाऱ्या विशिष्ट परिस्थितीत सहकारी चळवळीमध्ये उद्भवणाऱ्या समस्यांचा साकल्याने अभ्यास करून तिच्या विकासाच्या वेदनांचा वेध घेणे आवश्यक आहे .भारतीय समाजाच्या आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात वळणे घेऊन विकास पावणाऱ्या भारतीय सहकारी चळवळीचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधनामध्ये पेपर मध्ये केला आहे. समान आर्थिक निष्ठा असणारे गरजू लोक स्वच्छेने एकत्र येऊन लोकशाही पद्धतीने सहकारी संस्था स्थापन करतात.

**बीज संज्ञा: सहकार, सहकार विकास आणि वृद्धी, सहकार चळवळ**

**उद्दिष्टे :**

1. **भारताच्या आर्थिक विकासातील सहकाराचे स्थान अभ्यासणे.**
2. **भारताच्या आर्थिक विकासात सहकाराचे योगदान अभ्यासणे.**

**संशोधन पद्धती :**

सदर शोधनिबंध साठी दुय्यम सामग्री चा आधार घेतला असून यात प्रकाशित संदर्भ ग्रंथांचा, लिखित पुस्तके ,मासिके ,संशोधन पेपर यांच्यातून माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

**देशाच्या आर्थिक विकासातील सहकाराचे स्थान**

जगातील विकसित व मागासलेले देश हे गरिबी आणि दारिद्र्याचा दुष्टचक्रात सापडलेले असतात .ज्या वेळेस असे देश आर्थिक विकासाचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांना भांडवलाचा कमी वेग , भांडवलाचा तुटपुंजेपणा आणि उद्योगधंद्यांचा मागासलेपणा, शेतीचा मागासलेपणा, प्रचंड लोकसंख्या ,मोठ्या प्रमाणात बेकारी इत्यादींसारख्या अडचणींना तोंड द्यावे लागते. ठेवी आणि बचतींना अधिकाधिक प्रोत्साहन देऊन भांडवल निर्मिती करणे व त्याआधारे औद्योगिक विकासाचा वेग वाढवणे हा त्यावर उपाय ठरतो. अशा अविकसीत आणि मागासलेल्या देशांच्या सामाजिक विकासाबरोबर आर्थिक विकास साधण्याच्या दृष्टीने सहकार चळवळीचा मोठ्या प्रमाणात उपयोग होऊ शकतो. सहकार ही अशी ऐच्छिक संघटना आहे की ,जिच्या द्वारे बचतीला प्रोत्साहन देऊन परस्पर सहाय्याच्या आधारे विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. विसाव्या शतकात भारत आणि आशियाई,इतर काही आफ्रिकी आणि लॅटिन अमेरिकन देशातून सहकारी चळवळ सुरू करण्यात आली. काही दशकात येथील ग्रामीण भागाचे रूप पालटले गेले. आज स्वतंत्र झालेल्या सर्व आशियाई आफ्रिकन राष्ट्रातून सहकारी चळवळीकडे आर्थिक विकास बेकारी कमी करण्याचे आणि ग्रामीण भागातील जनतेला आश्रय देण्याचे एक साधन या दृष्टिकोनातून पाहिले जाते. या देशातील नागरी भागातून सहकारी पद्धतीचे उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात निघत आहेत .बऱ्याच विकसनशील देशांतून सहकारी संस्थांची निर्मिती आणि विकास हा राष्ट्रीय धोरणाचा एक भाग म्हणून त्याचा स्वीकार करण्यात आला. सामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने सहकारी संस्थांचे महत्व पटल्यामुळे आंतरराष्ट्रीय संघटनांकडून सहकारी संस्थांना सहकाराच्या कार्यक्षेत्राची वाढ व विकास होण्यासाठी तांत्रिक आणि आर्थिक स्वरूपाची मदत दिली जात आहे. बऱ्याच विकसनशील औद्योगिक दृष्ट्या प्रगत देशातून आर्थिक आणि सामाजिक विकासाचे एक साधन या दृष्टीने सहकारी चळवळीचा अधिक विकास होण्याच्या दृष्टीने सरकारने त्यांना आवश्यक आर्थिक आणि तांत्रिक मदत प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने संस्था स्थापन केल्या आहेत .भारतात पंचवार्षिक योजनात अर्थव्यवस्थेत जलद आणि आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने महत्वाचे हत्यार या अर्थाने सहकारी संस्थांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात मदत केली आहे. तसेच पतपुरवठा संस्था ,ग्राहक संस्था ,लघुउद्योग इत्यादी प्रकारच्या संस्थांच्या स्थापनेत आणि विकासात सरकाराने बरीच मदत केली आहे.

**देशाच्या आर्थिक विकासात सहकाराची भूमिका**

**कृषी विकास**

देशाच्या आर्थिक क्षेत्रात कृषी क्षेत्राचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. विकसनशील देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा टक्क्यांहून अधिक असतो 50. भारत आणि अन्य विकसनशील देशात सहकारी क्षेत्रात कृषि उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावा लागतो आणि त्याच बरोबर शेतकरी वर्गाची सावकारांच्या पाशातून मुक्तता करणे, शेतीसाठी अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणे, शेतीसाठी अवजारे ,सुधारित बी-बियाणे, जंतुनाशके आणि खतांचा पुरवठा करण्याचे काम करावे लागते .बदलत्या जागतिक परिस्थितीत सहकारी संस्थांना विशेष लक्ष द्यावे लागते. कृषी उत्पन्न वाढ ,खर्च कमी करणे आणि सभासदांच्या उत्पादनांना अधिक भाव मिळवून देणे, या बाबीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे लागत आहे.

**कृषी संशोधन:** कृषी क्षेत्र विकासात सहकारी क्षेत्र महत्त्वाची भूमिका पार पाडीत आसते. त्यात कृषी संशोधनाचे कार्य अत्यंत आवश्यक ठरते. सहकारी संस्थांना फक्त उत्पादन वाढीचा विचार न करता ,धान्याच्या नवीन जाती शोधणे ,कृषी

महाविद्यालयाच्या मदतीने संशोधित बी-बियाणांचे उत्पादन करणे ,फळांच्या सुधारित जाती विकसित करणे व संशोधन खतांचा वापर, पाणीपुरवठा व्यवस्थापन, पीक संरक्षण इत्यादींचा विचार करावा लागतो. साखर कारखाना क्षेत्रातून शेती परिषदा घेऊन शेतकऱ्यांचे पायलेट स्कीम राबविण्यात सहकार्य मिळवणे ,ऊसाच्या नविन जाती तयार करणे ,पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणे, पिकांवरील रोग नियंत्रित तसेच पिकांवर हवामानातील बदलाचा होणारा परिणाम आणि घ्यावयाची काळजी याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे या कार्यात सहकार्य क्षेत्राची कामगिरी विशेष मोलाची ठरते.

**औद्योगिक विकासास चालना**

औद्योगिक क्षेत्राच्या विकासात सहकारी क्षेत्रास विशेष महत्त्वाची भूमिका बजवावी लागते .अर्थव्यवस्थेतील 80 टक्के उद्योग हे कृषी क्षेत्रावर आधारित असतात .सहकारी क्षेत्राद्वारे कृषी क्षेत्राचा विकास घडविण्याचे कार्य चालते त्यातूनच औद्योगिक विकासास चालना मिळते. ग्रामीण भागात कृषी उद्योगाचा विकास घडविण्याचे कार्य सहकारी संस्था करू शकतात सहकाराच्या छत्राखाली कृषी उत्पादकांना एकत्र आणून सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या ,सहकारी दूध प्रक्रिया संस्था ,सहकारी खत कारखाने, सूत गिरण्या, भात गिरण्या ,फळ प्रक्रिया संस्था, तागाच्या गिरण्या इत्यादी उद्योगांचा सहकारी तत्त्वावर विकास करता येतो.

**लघु उद्योगांचा विकास**

ग्रामीण अर्थव्यवस्थेत लघु उद्योगांना विशेष महत्त्व असते .सहकारी क्षेत्र ग्रामीण भागातील कारागीर हस्तशिल्पी ,रेशीम विणकर, खादी उत्पादन ,कागद निर्मिती ,वृक्षसंवर्धन ,फलोद्यान ,परंपरागत ऊर्जा वापर ,अखाद्य तेल निर्मिती, साबण निर्मिती ,कुंभार शिल्प ,पापड, मसाला निर्मिती ,औषधी वनस्पती निर्मिती ,डिंक ,लाख गोळा करणे इत्यादी उद्योगांच्या विकासासाठी अल्प व्याजदरात कर्जे देणे. कारागिरांनि प्रशिक्षण सोय, उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देणे इत्यादी बाबतीत सहकारी क्षेत्राची भूमिका विशेष महत्त्वाची आहे.

**उत्पन्नात वाढ**

देशाच्या ग्रामीण भागातील कृषी क्षेत्र आणि लघुउद्योग व स्वयंरोजगार क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या जनतेच्या उत्पांनात वाढ होण्याच्या दृष्टीने सहकारी क्षेत्राची कामगिरी महत्त्वाची ठरते .कृषी मालाला योग्य भाव मिळवून देणे आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मदत करणे या द्वारे शेतकरी वर्गाच्या उत्पन्नात भर पडण्यास मदत होते .कृषी उत्पादनाशी संबंधित प्रक्रिया उद्योगांची स्थापना केल्याने कृषी मालाला अधिक भाव मिळतो तसेच लघु उद्योग, कुटिरोद्योग आणि अन्य ग्रामीण उद्योगांना अर्थसहाय्य करणे, कारागिरांना प्रशिक्षण देणे ,आधुनिक तंत्राचा वापर शिकविणे, बाजारपेठ मिळवून देणे इत्यादींमुळे उद्योग उद्योजकांचे उत्पन्नाचे प्रमाण वाढते.

**सुविधांचा विकास**

सहकाराच्या माध्यमातून कृषी उद्योग आणि लघु उद्योगांचा ग्रामीण क्षेत्रात विकास करण्यासाठी प्रथम मूलभूत सुविधांचा विकास करावा लागतो. ग्रामीण भागात पाणीपुरवठा आणि वीज पुरवठा सुविधांचा विकास होण्यासाठी सरकार आर्थिक मदत आणि प्रोत्साहन देते .कृषिपंपांना विजेचा पुरवठा करणे व त्यातून शेतीसाठी पाणीपुरवठ्याची सोय करणे, ग्रामीण भागात खेड्यांना जोडणारी असे रस्ते बांधणे की ज्यामुळे कृषी उत्पादने कारखान्यांना किंवा बाजारपेठांना पाठवता येतील . सहकारी संस्था सरकारी मदत जनतेपर्यंत पोहोचवितात.त्यामुळे भाजीपाला,

दूध ,फळे आणि अन्य नाशवंत मालास योग्य किंमत मिळू शकते.

**रोजगारात वाढ**

सहकाराने आर्थिक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका पार पाडण्यास सुरुवात केल्यापासून देशात रोजगाराच्या संधी वाढत असून रोजगार आणि स्वयंरोजगार वाढ होत आहे .भारतात सर्व सहकारी साखर कारखान्यात प्रत्येकी एक हजारपेक्षा अधिक लोकांना कायमचा रोजगार मिळाला असून हंगामाच्या काळात भूमिहीन मजूर आणि गरीब शेतकऱ्यांना तात्पुरता रोजगार उपलब्ध झाला आहे.

**नवीन आर्थिक धोरण आणि सहकारः-**

**बाजारातील स्पर्धाः**

नव्या धोरणामुळे प्रगत देशातील बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणावर भारतात आल्या आहेत. या कंपन्यांकडे प्रचंड प्रमाणात भांडवल आहे. तसेच या कंपन्या उच्च तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देतात. आधुनिक व्यवस्थापन कौशल्याचा वापर करतात. अशा कंपन्यांकडे संशोधन व विकास विभाग असतो. त्याद्वारे सतत संशोधन कार्य केले जाते. उत्पादन व उत्पादन विषय तंत्रज्ञानामध्ये आधुनिकता आणली जाते. त्यामुळे अशा सहकारी संस्थांना महाकाय कंपन्यांशी तीव्र स्पर्धा करावी लागत आहे.

**भांडवली सामर्थ्यः**

नवीन आर्थिक धोरणात विदेशी भांडवल मोठ्या प्रमाणात येत आहे. सरकारने विदेशी गुंतवणूकदारांसाठी अनेक सवलती जाहीर केल्या आहेत. त्यामुळे विदेशी गुंतवणूक वाढत आहेअनिवासी. भारतीयांकडूनही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून वेगाने गुंतून होत आहे. जागतिकीकरणामुळे उद्योग क्षेत्रात भांडवली सामर्थ्याला अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. या तुलनेत सहकारी संस्थांची भांडवली कुवत खूप कमी पडत आहे. सकारात प्रामुख्याने दुर्बल व सामान्य व्यक्तीचा सहभाग असल्याने प्रचंड प्रमाणात भांडवल उभारता येत नाही.

**व्यवस्थापकीय कौशल्यः** जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून बाजारात स्पर्धा निर्माण झाली आहे. स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी आधुनिक व्यवस्थापनात कौशल्याचा वापर केला जात आहे. उत्तम व्यवस्थापन कौशल्य, आधुनिक व्यवस्थापनाची तत्वे, कार्यक्षम प्रशासनची तत्वे आदींचा वापर वाढत आहे आहे. हुशार कार्यक्षम व धाडसी संयोजकांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ घेतला जात आहे. या तुलनेत सहकारी संस्था समाजाभिमुख असल्याने व्यवसायिक तत्वांचा वापर करता येत नाही.

**बाजारपेठांवर वर्चस्वः**

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनात विविधता असते. तसेच त्या कंपन्या विविध बाजारपेठांमध्ये मालाची विक्री करतात. सतत बाजारपेठांचा विस्तार करतात. सहकारी संस्था मात्र प्रामुख्याने स्थानिक बाजारात मालाची विक्री करतात. त्यांना बाजारपेठेचा विस्तार करता येत नाही. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वाढत्या प्रभावामुळे सहकारी संस्थांना आपल्या नेहमीच्या बाजारपेठा टिकवून ठेवणे कठीण जात आहे.

**उत्पादन तंत्रः**

नवीन धोरणाने भांडवलप्रधान तंत्राचा वापर वाढत आहे. उच्च दर्जाचे उत्पादन तंत्र वापरले जात आहे. आधुनिक यंत्र व तंत्र याचा वापर वाढत आहे. सहकारी संस्था मात्र परंपरागत उत्पादन तंत्राचा वापर करतात. अल्प भांडवलामुळे त्यांना उच्च तंत्रज्ञानाचा अंगीकार करता येत नाही. तसेच या संस्था प्रामुख्याने श्रम प्रधान तंत्राचा वापर करतात. रोजगार निर्मिती करणे हे यामागे उद्दिष्ट असते. जुन्या व परंपरागत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उत्पादन घेणाऱ्या सहकारी संस्था बहुराष्ट्रीय कंपन्या पुढे टिकू शकत नाहीत.

**दर्जा व गुणवत्ताः**

बहुराष्ट्रीय कंपन्या उच्च दर तंत्रज्ञानाचा अंगीकार करतात. त्यांच्या उत्पादनाचा दर्जा व गुणवत्ता उच्च प्रतीचे असते. नव्या उत्पादन पद्धतीमुळे त्यांना उत्पादन खर्च कमी राखता येतो. याद्वारे या कंपन्या अधिकाधिक ग्राहक आकर्षित करत आहेत. बाजारा वर्चस्व निर्माण करू पाहत आहेत. याचा परिणाम म्हणून सहकारी संस्थांना सुद्धा उत्पादनाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करावे लागत आहेत.

**जाहिरातीचा प्रभावः**

नव्या धोरणामुळे बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण होत आहे भारताच्या व्यापार व्यवहारांना भौगोलिक सीमा रेषा यांच्या मर्यादा राहिले नाही बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या वस्तूंच्या विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात जाहिराती करत आहे या कंपन्या प्रसारमाध्यमांवर आपले प्रभुत्व निर्माण करीत आहेत सहकारी संस्था मात्र जाहिरातीवर फार खर्च करू शकत नाही.

**संघटनात्मक प्रभावः**

जागतिकीकरणाच्या तत्त्वामुळे मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना अधिक वाव मिळत आहे. अशा कंपन्या निरनिराळ्या देशात आपल्या शाखा उघडतात. त्याद्वारे व्यापार वाढवतात स्पर्धाक्षमता वाढवण्यासाठी अनेक छोट्या कंपन्यांचे विलिनीकरण होत आहे. अशा मोठ्या आकाराच्या कंपन्यांची मुकाबला करण्यासाठी सहकारी संस्थांनी सुद्धा एकत्र येण्याची आवश्यकता आहे.

**ग्रामीण विकासाचा धोकाः**

मागील १०० वर्षात सहकारी चळवळ देशाच्या कानाकोपऱ्यात पोचली आहे. ग्रामीण भागात सहकारी चळवळ चांगली वाढली आहे या चळवळीने ग्रामीण विकासात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. सहकारी पतपुरवठा संस्था, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी प्रक्रिया संस्था, सहकारी खरेदी विक्री संस्था आदी संस्थांनी ग्रामीण भागाच्या विकासात महत्त्वाचा सहभाग घेतला आहे. जागतिकीकरणामुळे सहकारी चळवळी समोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. कार्यक्षमता, स्पर्धाक्षमता, भांडवली बळ, उच्च तंत्रज्ञान, शास्त्रीय व्यवस्थापन, जाहिरातबाजी याबाबतीत सहकारी संस्था कमी पडतात. याशिवाय सहकारी मदतीचे प्रमाण कमी झाल्यास किंवा मदत बंद झाल्यास सहकारी चळवळ आणखी अडचणीत येणार आहे.

**निष्कर्ष :**

1) देशाच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राने बहुमोल दिलेले आहे.

2) सहकाराच्या विकासाने भारताच्या ग्रामीण भागात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वातावरणात आमूलाग्र बदल घडून आला आहे.

3) सहकार हा आर्थिक ,सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाचा मार्ग बनला आहे.

**संदर्भ :**

1) सहकाराचा विकास : प्रा. डॉ.सी.जे. जोशी ,प्रा. के.सी .जोशी

2) सहकाराची मूळ तत्त्वे : व्ही.टी.चौगुले ,के. जी. पठाण

3)सहकाराचा विकास : डॉ.रूपा शहा

4) सहकारजगत मासिक

5) सहकार विश्व मासिक